# सांगली जिल्हा परिषद सांगली
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
पुष्पराज चौक, सांगली मिरज रोड सांगली ता.मिरज जि.सांगली
कार्यालय दूरध्वनी (०२३३)-२३७६६५० E-mail- cebnsangli@gmail.com


वाचले :- १) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७.
२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग,क्र.अनिओ/१००५१२६/सेवा-४.दि. ३१/१०/२००५.
३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं२००७/प्र.क्र.(४६/०७)१३-अ, दि. १९/१०/२००७.
४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही -२०१२/प्र.क्र.१८६/१२ दि.२८/०२/२०१३.
५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)१३-अ, दि. २७/०६/२००८.
६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,अधिसूचना, दि. ०५/१२/२०१२.
७) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रनिमं-१२१४/प्र.क्र.(४३/०७)१३-अ, दि. ०५/०६/२०१४.
८) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, अधिसूचना, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि. ३०/०१/२०१९.
९) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१९//प्र.क्र.१४१/आस्था-८ दि.१३/०९/२०२१.
१०) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रनिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ४/०५/२०२२.
११) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र. संकिर्ण२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५/०५/२०२३.
१२) महाराष्ट्र जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरणेसाठीची जाहिरात क्र.०१/२०२३ दि.०५/०८/२०२३.
१३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.राआधी४०२४/प्र.क्र.१४/१६-अ दि. २५/०१/२०२४.
१४) जिल्हा निवड समिती, सांगली यांचेकडील प्राप्त कनिष्ठ अभियंता (स्था) या संवर्गातील निवड व प्रतिक्षा यादी दि१८/०६/२०२४.
१५) ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांचेकडील क्रमांकःपदम-४३२४/प्र.क्र.३५९/आस्था-८, दि.१३/०६/२०२५.
१६) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, सांगली यांचेकडील दि.१२/०३/२०२५ व दि.१४/०८/२०२५ रोजीचे मंजूरी.
१७) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक- २१ /०८/२०२५

---

जा.क्र.जिपसां/ग्रापापु/आस्था-१/वशी/१८०२/२०२५. दिनांक :- २८/०८/२०२५

---

आदेश-

जिल्हा निवड समिती, सांगली कडून शिफारस केलेल्या खालील उमदवारांची जिल्हा सेवा गट (क) जिल्हा तांत्रिक सेवा **(वर्ग -३) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर वेतन श्रेणी एस-१४ (३८६००-१२२८००)** या वेतन संरचनेत अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते मध्ये नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जाहिरातीध्ये व खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा पत्ता | मुळ जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. कपिल भिमराव रोंगे | कनिष्क, प्लॉट नं.९, कर्मयोगी नगर, लिंक रोड, पंढरपूर, जि. सोलापूर -४१३३०४ | खुला | खुला (अराखीव) | पंचायत समिती आटपाडी |
| २. | श्री. सुमित सतिश डोंगळे | वसुंधरा, प्लॉट नं.७७, गणंजय नगर, कॉलेज रोड, माळभाग, कुरुंदवाड – ४१६१०६ | आ.दु.घ. | खुला (अराखीव) | पंचायत समिती तासगाव |
| ३. | श्री. अमर अशोक माने | मु.पो. अंबप, गणपती मंदिर जवळ, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर – ४१६११२ | आ.दु.घ. | आ.दु.घ. (अराखीव) | पंचायत समिती पलूस |
| ४. | श्री. सुयश शंकरराव बाबर | कायमचा पत्ता – भानुदास निवास, नागेश नगर चोपडी, ता.सांगोला, जि. सोलापूर – ४१३३०८ पत्रव्यवहाराचा पत्ता – नवासा निवास, गणेश कॉलनी, विजयनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१७ | आ.दु.घ. | आ.दु.घ. (अराखीव) | पंचायत समिती खानापूर |
| ५ | श्री. अरविंद उद्धव काळेल | कौठळी, ता. इंदापूर, जि. पुणे- ४१३१२० | इ.मा.व. | इ.मा.व. (अराखीव) | पंचायत समिती कडेगाव |
| ६. | श्री. सोमनाथ दत्तात्रय बाळसराफ | प्लॉट नं. २०६, सूर्यनगर, सोनारमळा, हडको कॉलनी, संजयनगर, सांगली- ४१६४१६ | इ.मा.व. | इ.मा.व. (अराखीव- माजी सैनिक) | पंचायत समिती मिरज |

नेमणूकीच्या अटी व शर्ती :-

१. उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी नियुक्ती आदेश मिळालेच्य दिनांकापासून ३० (तीस) दिवसाचे आत हजर व्हावे. उमेदवार मुदती आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झालेस नियुक्तीचा हक्क रद्द होईल.

२. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.

३. नेमणूकीच्या जागी हजर होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

४. उमेदवारांची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

५. उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजिनामा दयावयाचा असल्यास एक महिनेची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन शासन खाती जमा करावे लागेल.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४-ब, दि. १२ डिसेंबर २०११ अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांची जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैद्यता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैद्यता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल.जर पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैद्य ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल.अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्य पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणेत येईल. याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खांडपिठाने दि.२५ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश देणेत येत आहेत.

७. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील तरतूदीनुसार रुजू तारखेपासून दोन महिनेच्या आत वरील उमेदवारांनी आरोग्य खात्याने ठरवून दिलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेकडून स्वखर्चाने जिल्हा परिषदेचे नोकरीत नेमणेस योग्य असलेबद्दल शारिरीक पात्रतेचा दाखला त्यांना हजर करावा लागेल. त्यांनी वरील मुदतीत सदरचा दाखला हजर न केलेस अगर ते जिल्हा परिषदेचे नोकरीत नेमणेस अयोग्य ठरलेस त्यांना नोकरीतून ताबडतोब कमी करणेत येईल.

८. संबधित उमेदवाराने शासनाने विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र आदेशाच्य दिनांकापासून दोन वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा सदरची नेमणूक रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

९. महाराष्ट्र जिल्हा परिषद, (जिल्हा सेवा नियम) सेवा प्रवेश नियम,१९६७ मधील नियम ६(६) अन्वये उमदवाराने एक वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड मुदतीसाठी या पदावर समाधानकारकरित्या सेवा केल्यास किंवा परिविक्षीची मुदत समाधानकारकरित्या पूर्ण केली असेल किंवा इतर कोणतीही परिक्षा असल्यास, भाषा परिक्षा उत्तीर्ण झाली असेल तो किंवा ते पद धारण करण्याकरीता शासनाने ठरविले असल्यास प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय उमेदवारास जिल्हा सेवेतील पदावर कायम करण्यात येणार नाही.

१०. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकिय सेवेत नियुक्ती होणा-या उमेदवारांस नविन परिभषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरते. मात्र सध्या अस्तित्वांत असलेली निवृत्ती वेतनयोजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्तीवेतनांचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वांत असलेली सर्वसाधरण भ.नि.नि. योजना त्यांना लागु होणार नाही.) त्यानुसार प्रस्तुत उमेदवार नियुक्त झालेस जरुर ती कार्यवाही अवलंबणेत यावी.

११. संबंधित उमेदवारांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे व त्यांचे पालन न केल्यास आपली सेवा समाप्त करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

१२. वरील उमेद्वाराच्य नेमणूका या पोलीस खातेमार्फत त्या उमदवारांच्या पुर्व चारित्र्य या बाबतचा दाखला येण्याच्या अटीवर केल्या असून यास बाबत पोलीस खातेकडून प्रतिकुल शेरा आलेस त्यांना नोकरीतून ताबडतोब कमी करणेत येईल.

१३. उमेदवारास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दि.२८/०३/२००५ शासन परिपत्रक दि.०१/०७/२००५ मधील नमूद महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने हजर होताना दि. २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या मुलांची संख्या नमूद करुन हयात असलेल्या उदवाराची मुलांची संख्यास दोन पेक्षा अधिक असेल दि. २८/०३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी अनर्ह ठरणार आहे. असे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

१४. सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर महाराष्ट्र शासन किंवा मा. न्यायालय यांचेकडून निर्देश प्राप्त झालेस अगर संबंधिता च्या नियुक्ती बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आलेस किंवा नियुक्तीच्या वेळी नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर व कोणत्याही वेळी रद्द करणेत येईल.या बाबत अपील अर्ज करता येणार नाही. तसेच कोणत्याही मा. न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही.

१५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम क्र. २० नुसार ज्याची पत्नी हयात आहे अशा जिल्हा परिषद, कर्मचा-यास दुसरा विवाह करता येणार नाही. महिली कर्मचा-यांना ज्यांची पत्नी हयात आहे अशा जिल्हा परिषद कर्मचा-याशी दुसरा विवाह करता येणार नाही.

१६. नेमणूकीच्या दिनांकापासून तीन संधीमध्ये चार वर्षाच्या आत व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

१७) सदर आदेशातील अ. क्र. ६ या उमेदवारांना नमूद संदर्भ क्र. १५ व १६ अन्वये ज्या-त्या समाजिक समांतर आरक्षणातील माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने त्या-त्या सामाजिक आरक्षणातील अराखीव प्रतिक्षा सूचीतील पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेत आलेली आहे.

१८) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडून अथवा न्यायालयाकडून निर्देश / निर्णय प्राप्त झालेस त्यानुसार आपली निवड काणेत्याही टप्यावर कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

तृप्ती धोडमिसे(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सांगली.

**प्रति:-**

संबंधित श्री/श्रीम---------------------------------------------------------यांना

**प्रतिलीपी माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी-**

उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पंचायत समिती (सर्व) --------------------

२/- वरील उमेदवार हे मुदतीत हजर होतात अगर कसे या बद्दल मुदतीनंतर बिनचुकपणे इकडे अहवाल सादर करणेचा आहे.

**प्रत :- माहिती व कार्यवाहिस्तव-**

१. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सांगली
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सांगली.
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद, सांगली.
४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली.
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती , --------------- (सर्व)
६. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, पंचायत समिती---------- (सर्व)